## **NAINA (एन. ए. आय .एन. ए.) प्रकल्पातील झोन दाखल्यासाठी (Zone Certificate) आवश्यक असलेली कागदपत्रे**

१. मूळ जमिनमालकाचा जमिनीचा झोन दाखला मिळणेबाबत कोऱ्या कागदावरील अर्ज.

२. ७/१२ उताऱ्याची अलीकडील/हल्लीची मूळ किंवा साक्षांकित प्रत. (३ महिन्यांपेक्षा जास्त जुनी असता कामा नये.)

३. तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांचे (टी. आय. एल. आर.) कडील मूळ किंवा साक्षांकित मोजणी नकाशा आणि गट बुक नकाशा (गोळा नकाशा). हिस्सा क्रमांकासाठीच्या झोन दाखल्याबाबत अर्जदाराने गट बुक आणि संपूर्ण सर्व्हे क्रमांकाचे रेखाटन सादर केले पाहिजे आणि त्यामध्ये हिस्सा क्रमांकाची जागा दर्शविलेली असली पाहिजे.

४. ओळखपत्राची स्वयंसाक्षांकित प्रत आवश्यक. उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड

५. जमिनीच्या मूळ जमिनमालकांव्यतिरिक्त दुसऱ्या व्यक्तीद्वारे झोन दाखल हवा असल्यास, त्या व्यक्तीने विहित नमुन्यात मूळ जमिनमालकाची स्वाक्षरी असलेले नोटराईज्ड अधिकारपत्र अथवा कार्यकारी दंडाधिकारी यांची स्वाक्षरी असलेले पत्र जमा केले पाहिजे. (नोटराईज्ड अधिकारपत्रासोबत मूळ जमिनमालक व अर्जदार यांचे स्वयंसाक्षांकित ओळखपत्र अनिवार्य आहे.)

६. अर्जदाराने संबंधित अधिकाऱ्याकडून चलन काढणे आवश्यक आहे. चलन देय तारखेनंतर रद्द केले जाईल. म्हणून, कृपया देय तारखेला किंवा त्यापूर्वी पैसे भरावेत. महामंडळाकडून फक्त ऑनलाईन पेमेंट स्वीकारले जातील. त्यासाठी कृपया **https://cidco.maharashtra.gov.in/ol** या संकेतस्थळास भेट द्या.

झोन दाखल्यासाठी अर्जाबरोबर वर दिलेल्या यादीनुसार कागदपत्रे जोडणे आवश्यक.

**....... सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेनुसार.**

**कार्यालयीन कामकाजासाठी भेटण्याची वेळ: - दुपारी २ ते ५**